# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १७६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.१० जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## सिंहस्थ कुंभमेळा रिंगरोडच्या अलाइनमेंट बदलाची उच्चस्तरीय चौकशी करणार-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी प्रस्तावित बाह्य रिंगरोड प्रकल्पात कमीत कमी भूसंपादन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असून, मातोरी आणि मुंगसरे परिसरातील रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये काही विशिष्ट व्यक्तींना लाभ मिळावा म्हणून बदल करण्यात आला आहे का, याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय दिला जाईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित रिंगरोडच्या अलाइनमेंटमध्ये बदल झाल्याबाबत सदस्य विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य सरोज अहिरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, हा रिंगरोड भविष्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प असून, तो राबविताना शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन योग्य व समाधानकारक मोबदला देण्यावर शासनाचा भर राहील. शक्य तितके कमी भूसंपादन करून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. मोजणीच्या वेळी काही ठिकाणी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांच्या विरोधामुळे अधिकाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने हेल्मेट व अन्य संरक्षक साहित्याचा वापर केला होता. मात्र, प्रकल्पाबाबत कोणावरही अन्याय होणार नाही, याची शासन दक्षता घेईल.

## महाराष्ट्रात समान नागरी कायदा लवकरच अस्तित्वात

### कायद्याच्या मसुद्यासाठी सात सदस्यीय समिती गठीत; मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- उत्तराखंडनंतर आता महाराष्ट्रात लवकरच समान नागरी कायदा अस्तित्वात येणार असल्याचे दिसून येते, त्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या अधिवेशनातच याबाबत माहिती दिली होती. समान नागरी कायद्यासंदर्भात ७ जणांची समिती नेमण्यात येत असून सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून सात जणांची समिती घोषित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आज समान नागरी कायद्याबाबत पुन्हा एकदा घोषणा केली, ही समिती येत्या सहा महिन्यात अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे. समान नागरी कायद्याचा मसूदा येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. दोन्ही सभागृहासमोर हा मसुदा आल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठीचे सोपस्कार पार पडतील.

**गठीत केलेली समिती**

रंजना देसाई- अध्यक्ष (माजी न्यायमूर्ती सर्वोच्च न्यायालय)
आरसी चव्हाण (सदस्य)-माजी न्यायाधीश उच्च न्यायालय मुंबई
एस जी बेहेरे (सदस्य)-माजी न्यायाधीश उच्च न्यायालय मुंबई
डी.के.जैन (सदस्य) माजी मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य
वीरेंद्र सराफ (सदस्य) माजी महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य
रमेश पतंगे (सदस्य) माजी पद्मभूषण
डॉ. सुवर्णा रावळ (सदस्य) सामाजिक कार्यकर्ता

२०२६ च्या अर्थसंकल्प अधिवेशनात समान नागरी कायद्यासंदर्भात आणि अंमलबजावणीसाठी समिती घोषित केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री यांनी केली होती. त्यानुसार, समान नागरी कायद्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांची कमिटी तयार करण्यात येत आहे, अशी माहिती आशिष शेलार यांनी दिली.

दरम्यान, समान नागरिक कायद्यासाठी या सात जणांची समिती तयार करण्यात आली असून डिसेंबरच्या अधिवेशनात याबाबतचा अहवाल तयार केला जाईल आणि दोन्ही सभागृहात हे विधेयक मांडण्यात येईल, असेही आशिष शेलार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

उत्तराखंडमध्ये २७ जानेवारी २०२५ रोजी समान नागरी कायदा लागू करण्यात आला. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी याबाबत घोषणा केली, समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य ठरले. गतवर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने नागरी कायदा मंजूर केला होता. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी याविषयीच्या समितीने समान नागरी कायद्याचा अहवाल दिला. त्यानंतर हा कायदा लागू करण्यात आला. आता, महाराष्ट्रातही हा कायदा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात लागू करण्यात येत आहे.

## मिसिंग लिंक प्रकल्पाची श्वेतपत्रिका जाहीर करा; नाना पटोलेंची मागणी



मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत काँग्रेस सरकारने हा प्रकल्प नाकारल्याचा दावा केला होता. मात्र, हा दावा खोटा असून मुख्यमंत्र्यांनी सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची माहिती मांडली, असा आरोप पटोले यांनी केला.

पटोले म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पाची संकल्पना काँग्रेसच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यकाळात पुढे आली होती. सुरुवातीला या प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे तीन हजार कोटी रुपये होता. मात्र काही तांत्रिक बाबींची पडताळणी आणि खर्चाचा पुनर्विचार करण्यासाठी त्यावेळी काही निरीक्षणे नोंदवण्यात आली होती. काँग्रेसने हा प्रकल्प रद्द केला नव्हता, तर तांत्रिक कारणांमुळे त्याचा फेरआढावा घेतला जात होता, असे त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या सरकारच्या काळात या प्रकल्पाचा खर्च तब्बल ७,१८१ कोटी रुपयांवर पोहोचल्याचा दावा करत पटोले यांनी सरकारला धारेवर धरले. एका किलोमीटरसाठी सुमारे ५४० कोटी रुपये खर्च झाल्याचे सांगत, एवढा खर्च नेमका कशावर झाला याची सविस्तर माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी त्यांनी केली.

त्यांच्या मते, या प्रकल्पाची संपूर्ण ब्लूप्रिंट, खर्चाचा तपशील आणि श्वेतपत्रिका सरकारने जाहीर करावी. अलीकडे झालेल्या घटनेची कारणेही सरकारने स्पष्ट करावीत, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेतील भाषणात माध्यमे आणि विरोधकांना अप्रत्यक्षपणे धमकावल्याचा आरोपही पटोले यांनी केला. सरकारवर टीका करणे म्हणजे महाराष्ट्राची बदनामी नव्हे, तर लोकशाहीतील विरोधक आणि माध्यमांची ती जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. "सरकारवर प्रश्न उपस्थित करणे हा आमचा अधिकार आहे. जनतेच्या पैशांचा वापर कसा झाला, कर्ज कुठून घेतले आणि ते कोण फेडणार याची उत्तरे सरकारने द्यायलाच हवीत," असे पटोले म्हणाले.

याच मुद्यावर बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, अभूतपूर्व पाऊसाबाबत बोलायचे झाले तर २००५ साली मुंबईत काय झाले होते? हळूहळू मान्सूनचा पॅटर्न आणि हवामानची परिस्थिती बदलत आहे. त्याचा अभ्यास केला नसेल तर ते दुर्दैवी म्हणायला पाहिजे, अशी टिप्पणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.

पृथ्वीराज चव्हाण यांनी या मिसिंग लिंकबाबत त्यांच्यावर करण्यात आलेला धोरण लकव्याचा आरोपही स्पष्टपणे फेटाळून लावला. त्यांनी म्हटले की, याबाबत लोकांसमोर वस्तुस्थिती येणे गरजेचे आहे. अशी चर्चा सुरु आहे की, मिसिंग लिंक प्रकल्प मी होऊ दिला नाही, तो मी बंद केला. पण मुळात मिसिंग लिंकची कल्पना (पान ४ वर)

### देवेंद्र फडणवीसांच्या विधानावर संजय राऊतांची घणाघाती टीका

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील महत्त्वाकांक्षी मिसिंग लिंक प्रकल्पावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या भूस्खलनावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. ७ हजार कोटी रुपये खर्चून बांधलेल्या या मार्गावर दरड कोसळल्याने विरोधकांनी सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले होते. या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "एक कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर हे लोक पैदा झाले असतील," अशा आक्रमक शब्दांत ट्रोलर्स आणि विरोधकांचा समाचार घेतला होता. मुख्यमंत्र्यांच्या या भुमिकेनंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी टीकेचा भडीमार सुरु केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, "जनतेला मूर्ख बनवायचे आणि त्यानंतर हा प्रकल्प कोसळून पडतो. जनतेच्या कराच्या पैशाला भगदाड पडते आणि त्यावर जनता व्यक्त झाली, मग ते समाज माध्यमांवर असेल, वृत्तपत्रात असेल किंवा टीव्हीला असेल; तर जनतेला भाड्याचे टट्टू किंवा कुत्रे असे म्हणून त्यांची चेष्टा करायची? हे फक्त सुलतानाच्या राज्यात होऊ शकते. हे सुलतानाचे राज्य आहे आणि त्यांच्यासोबत आजूबाजूला जे निजाम आहेत, ते काल फिदीफिदी टाळ्या वाजवत होते. लाज वाटली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रातील ही सुलतानशाही आहे."

"महाराष्ट्राच्या बदनामीचे सगळ्यात मोठे षड्यंत्र जर कोणी रचले असेल, तर ते अमित शाहांनी, नरेंद्र मोदींनी रचले आहे आणि खाण तशी माती त्याच्या खाली देवेंद्र फडणवीस आहेत. महाराष्ट्राची काय बदनामी केली? सत्य बोलणे ही महाराष्ट्राची बदनामी आहे का? तुम्ही विरोधी पक्षनेते असताना किती बेफाम आरोप करत होतात, कोरोना काळापासून सर्व विषयांवर; ते जरा तुम्ही एकदा स्वतः ऐकून बघा," अशी टीका त्यांनी केली.

## इराणच्या अणू-स्थळांजवळ अमेरिकेचा हल्ला

वॉशिंग्टन दि.९ (वृत्तसंस्था)- इराणने बुशेर अणुऊर्जा प्रकल्पाजवळ हवाई हल्ला केल्याचा आरोप अमेरिकेवर केला आहे. अल जझीराच्या वृत्तानुसार, हा हल्ला दुपारी १२:०० च्या सुमारास झाला. दरम्यान, द न्यूयॉर्क टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने गेल्या दोन दिवसांत इराणच्या १७० हून अधिक लष्करी ठिकाणांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे हल्ले केले आहेत.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यांमध्ये स्ट्रेट ऑफ होर्मुझजवळील किनारपट्टीवरील हवाई संरक्षण यंत्रणा, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा साठा, लष्करी वेगवान बोटी आणि लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आले.

याला प्रत्युत्तर म्हणून, कतार, कुवेत आणि बहरीन येथील अमेरिकन लष्करी तळांवर ड्रोन हल्ले केल्याचे इराणने जाहीर केले. इराणी लष्कराच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यांमध्ये कुवेतमधील पॅट्रियट क्षेपणास्त्र यंत्रणा, कतारमधील अर्ली-वॉर्निंग सॅटेलाइट अँटेना आणि बहरीनमधील अमेरिकन लष्कराच्या इंधन टाक्यांना लक्ष्य करण्यात आले.

## अजितदादा पवार यांना मरणोत्तर पद्मविभूषण द्या, राष्ट्रवादीच्या आमदारांची मागणी

### देवेंद्र फडणवीस यांना निवेदन, केंद्राकडे शिफारस करण्याची विनंती

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजित अनंतराव पवार उर्फ अजितदादा पवार यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करावे, अशी मागणी महाराष्ट्र विधानमंडळातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी केली आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी निधन झालेल्या अजितदादा पवार यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणावर मोठा ठसा उमटवला, असं आमदरांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री हसन मुश्रीफ, चेतन तुपे, माजी मंत्री अनिल पाटील, माणिकराव कोकाटे, संजय बनसोड, आमदार सरोज अहिरे यांच्यासह राष्ट्रवादीचे इतर आमदार यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात मुख्य प्रतोद चेतन तुपे यांनी म्हटले आहे की, २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या अत्यंत दुर्दैवी अपघातात आपण महाराष्ट्राचे आणि आपल्या सर्वांचे लाडके नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार (अजितदादा) यांना गमावले. ही महाराष्ट्राची आणि देशाची कधीही न भरून निघणारी हानी आहे.

अजितदादांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला एक नवी दिशा दिली. एक कणखर प्रशासक, अहोरात्र कष्ट करणारे लोकप्रतिनिधी आणि ॲक्शन ओरिएंटेड नेते म्हणून त्यांनी जनमानसावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या या महान राष्ट्रसेवेचा आणि नेतृत्वाचा यथोचित सर्वोच्च गौरव म्हणून त्यांना भारत सरकारचा अत्यंत मानाचा पद्मविभूषण (मरणोत्तर) पुरस्कार जाहीर व्हावा, ही महाराष्ट्रातील तमाम जनतेची आणि आम्हा सर्वांची तीव्र भावना आहे. राज्याचे अर्थमंत्री म्हणून त्यांनी विक्रमी वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडून प्रत्येक क्षेत्राला न्याय दिला. पायाभूत सुविधा, रस्ते विकास, मेट्रो आणि सिंचन क्षेत्रात त्यांनी घेतलेले निर्णय क्रांतिकारी ठरले.महाराष्ट्रातील सहकार चळवळ मजबूत करण्यात आणि शेतकऱ्यांना संकटकाळात थेट आर्थिक मदत मिळवून देण्यात त्यांनी नेहमीच आग्रही भूमिका घेतली होती.

## मतदार यादी पुनर्रिक्षण कामामुळे शिक्षकांच्या अध्यापनावर परिणाम नाही-राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- मतदार यादी पुनरीक्षण कामासाठी शिक्षकांच्या सेवा घेण्याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नावर संबंधित विभागांची तातडीची बैठक घेऊन योग्य उपाययोजना करण्यात येतील. तसेच शिक्षकांच्या निवडणूक कामकाजाचा त्यांच्या अध्यापनावर कोणताही परिणाम होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असे आश्वासन राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिले.

या संदर्भात नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेदरम्यान सदस्य जगन्नाथ अभ्यंकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. भोयर बोलत होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० आणि १९५१ मधील तरतुदींमुळे अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या निवडणूक कामकाजाबाबत कायदेशीर बाबी निर्माण झाल्या असून, यासंदर्भात न्यायालयीन निर्णयही झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने निवडणूक अधिकाऱ्यांना सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

या सूचनांनुसार, शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त (पान ४ वर)

## मुख्यमंत्र्यांची विधानसभेत बघून घेईनची भाषा कशी?

### मिसिंग लिंक आणि राम मंदिर चोरीवरून राज ठाकरेंची टीका



मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- "पुणे-मुंबई एक्स्प्रेसवेवरील मिसिंग लिंकच्या मुद्द्यावरून विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देख लुंगा अशी भाषा वापरतात आणि चक्क हिंदीतून बोलतात. तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात, समोर बसलेले आमदार मराठी आहेत, मग तुम्ही विधानसभेत हिंदीतून कुणाला दम देत आहात? दिल्लीत बसलेल्या तुमच्या पक्षातील वरिष्ठांना संदेश द्यायचा आहे का?" अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर सडकून टीका केली.

महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त आणि कार्यालयाच्या तसेच लोगोच्या अनावरण सोहळ्यात राज ठाकरे बोलत होते. यावेळी त्यांनी रेल्वेतील परप्रांतीयांची भरती, राम मंदिरातील कथित चोरी आणि मिसिंग लिंकवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मिमिक्री करत राज्य व केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला.

विधानसभेत मिसिंग लिंकवरील चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराचा राज ठाकरेंनी खरपूस समाचार घेतला. राज ठाकरे म्हणाले, "विधानसभेत मुख्यमंत्री म्हणतात की जर कोणी राजकारण करत असेल तर आम्ही बघून घेऊ. अरे, तू मुख्यमंत्री आहेस ना? बघून घेईन काय म्हणतोस? बरं, हे बोलून झाल्यावर ते लगेच हिंदीत बोलू लागले की मिसिंग लिंक के बारे में अगर कोई राजनीती करे... तुम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेत हिंदीतून का बोलताय? तुम्हाला कुणाला दाखवून द्यायचे आहे?" राज्यात आणि शहरांत सुरू असलेल्या विकासकामांच्या विचक्यावर त्यांनी संताप व्यक्त केला.

राज ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील भाषणाची मिमिक्री करत त्यांच्या दाव्यांची खिल्ली उडवली. "मिसिंग लिंकच्या ठिकाणी खांब कोसळला, पाणी गळत आहे आणि (पान ४ वर)

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ५ ते ६ खासदार अस्वस्थ, पृथ्वीराज चव्हाणांचा दावा

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून अनेक घडामोडी घडत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या ६ खासदारांनी काही दिवसांपूर्वी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला. या सर्व घडामोडी दरम्यान 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा झाली. त्यानंतर काही दिवसांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांनी महायुतीच्या ऑफरबाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर राजकीय चर्चांना उधाण आलं होतं. त्यांच्या वक्तव्यानंतर 'ऑपरेशन तुतारी'च्या चर्चांनी जोर धरला होता.

या घडामोडीनंतर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदारांबाबत काँग्रेसचे नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी एक मोठा दावा केला आहे. 'शरद पवारांचे ५ ते ६ खासदार अस्वस्थ असून उद्धव ठाकरे यांच्या पक्षासारखी अवस्था शरद पवारांच्या पक्षाची होऊ शकते', असं वक्तव्य पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

शरद पवारांच्या ५ ते ६ खासदारांना भारतीय जनता पक्षात घेण्याचा प्रयत्न आहे की एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत? असा प्रश्न पत्रकारांनी पृथ्वीराज चव्हाण यांना विचारला. यावर उत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, "मला ते माहिती नाही. (पान ४ वर)

## दुसऱ्यांचे पक्ष खाणारी चेटकीण म्हणजे भाजप-हर्षवर्धन सपकाळ

बुलडाणा दि.९ (प्रतिनिधी)- देशात सध्या भाजप आणि काँग्रेस हे दोनच प्रमुख पक्ष उरले असून २०२९ ची आगामी निवडणूक याच दोन पक्षाच्या माध्यमातून लढली जाईल. इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी एकत्रितपणे भाजपविरोधात लढावे, हीच काँग्रेसची भूमिका आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हटले आहे. दुसऱ्यांचे नेते आणि कार्यकर्ते खाणारी चेटकीण म्हणून भाजपने आपले अस्तित्व निर्माण केले आहे, अशा शब्दांत सपकाळ यांनी भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणावर टीका केली.

नाशिकमधील एका घटनेचा हवाला देत हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोटेपणाचा आरोप केला. ते म्हणाले, नाशिक परिसरात ढगफुटी होणार आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी तिथल्या शाळा आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रत्यक्षात तिथे कोणतीही ढगफुटी झाली नाही. काँग्रेसचे आंदोलन दडपण्यासाठी आणि आमची अडवणूक करण्यासाठीच पोलिसांनी या खोट्या इशाऱ्याचा आधार घेतला. यावरून राज्यात खोटे कोण बोलत आहे, हे स्पष्ट दिसून येते.

हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अनेक जुन्या घोषणांची आठवण करून देत त्यांच्यावर निशाणा साधला सपकाळ म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेससोबत कधीच युती करणार नाही, अजित पवारांना जेलमध्ये टाकू, असे म्हणणारे आज कुठे आहेत? मुख्यमंत्री झाल्यावर पहिली सही धनगर आरक्षणावर करेन, असे फडणवीस म्हणाले होते; त्याचे काय झाले? मग खोटे कोण बोलले? जोपर्यंत वेगळा विदर्भ होत नाही, तोपर्यंत मी लग्न करणार नाही, असेही कोणीतरी म्हटले होते. आता त्यांनी लग्न केले की नाही? असा खोचक सवाल सपकाळ यांनी केला आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत दीड हजारांऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली होती, मात्र प्रत्यक्षात महिलांच्या पदरी काहीच पडले नाही, असा आरोपही त्यांनी केला.

## विद्यार्थ्यांची गळती रोखणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य-मंत्री दादाजी भुसे

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- ज्ञानदानाचे पवित्र काम करण्यात अनेक महानुभावांचे मोठे योगदान आहे प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण क्षेत्रात त्यांनी मोठे काम केले असून राज्यातील विद्यार्थ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध आहे. राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न आणि शाळांमधील मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी शासन सर्वंकष धोरण राबवत असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे, असे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य विक्रम काळे यांनी याविषयी विधानपरिषदेत म. वि. प. नियम २६० अन्वये प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाच्या चर्चेत सदस्य सुधाकर अडबाले, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, धैर्यशील कदम, (पान ४ वर)

## ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात रमेश म्हात्रें विरोधात डॉक्टरांचे आंदोलन, नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी

ठाणे दि.९ (प्रतिनिधी)- डोंबिवलीतील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात महिला डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेले शिवसेना (शिंदे गट) नगरसेवक रमेश म्हात्रे यांना छातीत दुखत असल्याची तक्रार झाल्याने ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एकीकडे डॉक्टरांकडून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असतानाच, दुसरीकडे त्याच रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनी हाताला काळ्या फिती बांधून निषेध आंदोलन करत रमेश म्हात्रे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली.

शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांवरील हल्ल्यानंतर संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी रमेश म्हात्रे यांना अटक केली. अटकेनंतर प्रकृती अस्वस्थ असल्याचे सांगत त्यांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांनी रुग्णालय परिसरात काळ्या फिती बांधून आंदोलन केले.

"आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षा द्या " अशा घोषणा देत त्यांनी निषेध व्यक्त केला. तसेच डॉक्टरांवर हात उगारणाऱ्या लोकप्रतिनिधीला नगरसेवक पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नसल्याचे सांगत रमेश म्हात्रे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक तथा वरिष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. धीरज एस. महांगडे यांनी स्पष्ट भूमिका मांडली. डॉक्टर म्हणून आमचे कर्तव्य आम्ही प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. रमेश म्हात्रे यांच्यावर आवश्यक ते उपचार सुरू असून त्यांना आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळपर्यंत रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात येईल. मात्र, उपचार करणे हे आमचे कर्तव्य असले तरी डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत होऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

## संतपीठाच्या विकासासाठी तातडीने १ कोटींचा निधी-मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई दि.९ (प्रतिनिधी)- सध्या संतपीठ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा एक विभाग म्हणून कार्यरत आहे. संतपीठाच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक असून, तातडीच्या गरजांसाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संस्थेने मागितलेल्या ३५ कोटी रुपयांच्या निधीबाबतही आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य श्रीकांत भारतीय यांनी म.वि.प. नियम ९७ अन्वये याविषयी विधानपरिषदेत अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, सध्या संतपीठामध्ये २०२१ ते २०२५ या कालावधीत १,०७२ विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले असून, यंदापासून एक वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संतपीठासाठी काही बांधकामे पूर्ण करणे तसेच प्राध्यापक (पान ४ वर)

# चांगल्या वागण्यातून घडते चरित्र

माणसाच्या आयुष्यात ज्ञान, संपत्ती, पद किंवा प्रसिद्धी यांना महत्त्व आहे; पण या सर्वांपेक्षा मौल्यवान गोष्ट म्हणजे चरित्र. चरित्र एका दिवसात घडत नाही. ते आपल्या दैनंदिन वागण्या-बोलण्यातून, सवयींमधून आणि संस्कारांमधून हळूहळू घडत असते. म्हणूनच म्हटले जाते, चांगल्या वागण्यातून चरित्र घडते. चांगले वागणे म्हणजे फक्त गोड बोलणे नव्हे. त्यामध्ये प्रामाणिकपणा, नम्रता, वेळेचे पालन, दुसऱ्यांचा आदर, सहकार्याची भावना, शिस्त, जबाबदारी आणि सत्याची साथ यांचा समावेश होतो. जो माणूस प्रत्येकाशी प्रेमाने व आदराने वागतो, तो नकळत इतरांच्या मनात आपले स्थान निर्माण करतो. त्याचे हेच वर्तन त्याच्या चारित्र्याची खरी ओळख बनते.लहान-लहान कृतीदेखील चरित्र घडवतात. चूक झाली तर ती स्वीकारणे, दिलेला शब्द पाळणे, कोणाची फसवणूक न करणे, गरजूंना मदत करणे, मोठ्यांचा सन्मान करणे आणि लहानांशी प्रेमाने वागणे - या साध्या वाटणाऱ्या गोष्टीच व्यक्तिमत्त्वाला उंची देतात. चांगले विचार आणि चांगले आचरण यांचा संगम म्हणजे उत्तम चरित्र.आजच्या स्पर्धेच्या युगात यश मिळवण्यासाठी अनेकजण धडपड करतात; परंतु यशापेक्षा चरित्र मिळवण्याची पद्धत अधिक महत्त्वाची असते. प्रामाणिक मार्गाने मिळवलेले यश टिकाऊ असते, तर चुकीच्या मार्गाने मिळवलेले यश क्षणिक असते. म्हणून आपल्या वागण्यात नेहमी सचोटी आणि नैतिकता असणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांनी विशेषतः लहानपणापासून चांगल्या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. शिक्षकांचा आदर, पालकांचे ऐकणे, नियमित अभ्यास, स्वच्छता, वेळेचे नियोजन आणि इतरांना मदत करण्याची वृत्ती यांमुळे उत्तम चारित्र्याची पायाभरणी होते. भविष्यात हेच विद्यार्थी जबाबदार आणि आदर्श नागरिक बनतात.शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, माणसाचे रूप नव्हे, तर त्याचे चरित्र त्याला खऱ्या अर्थाने सुंदर बनवते. म्हणून प्रत्येकाने आपल्या वागण्यात प्रेम, नम्रता, प्रामाणिकपणा आणि शिस्त यांचा स्वीकार करावा. कारण चांगल्या वागण्यातूनच चांगले चरित्र घडते आणि चांगल्या चरित्रातूनच यशस्वी, सन्माननीय आणि आनंदी जीवनाची निर्मिती होते.

**मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे । जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे - मनाचे श्लोक**

जगामध्ये वागताना आपल्याला कुणी नावे ठेवणार नाही याची काळजी घ्यावी लागते. योग्य काय, अयोग्य काय, याचा निवाडा होणे आवश्यक असते. आपल्या वागण्यातून आपले चारित्र्य तयार होते व त्यातून आपली सामाजिक प्रतिमा निर्माण होते. आपल्या हातून चुका घडू नयेत यासाठी आपण भक्तिमार्गाने जावे. मनोभावे भगवंताची पूजा करणे, भगवंताचे नामस्मरण करणे, भगवंताची कथा ऐकणे, भगवंताची सेवा करणे, याला भगवंताची भक्ती म्हणतात. भगवंत आपल्या भक्ताला चांगले वागण्याची बुद्धी देतो म्हणून भगवंताला प्रार्थना करताना 'बुद्धी दे रघुनायका' असे समर्थ म्हणतात. त्यासाठी भक्तिमार्गाची कास धरावी.- शबरी भक्ती -शबरी ही भिल्ल समाजातील एक कातकरी मुलगी होती. ती दहा वर्षांची असताना तिच्या वडिलांनी तिचे लग्न ठरवले. लग्नाच्या दिवशी लोकांना जेवताना मांसाहार द्यायचा म्हणून त्यांनी सुमारे ३०० शेळ्या आणल्या होत्या. आपल्या लग्नात या शेळ्या कापल्या जाणार हे कळताच शबरी खूप कळवळली. तिने आपल्या वडिलांना खूप विनवण्या केल्या.

पण वडिलांनी तिची समजूत घालण्याऐवजी तिला वेड्यात काढले. लग्नाच्या आदल्या रात्री शबरीला झोपच येईना. रात्रभर ती बैचेन होती. पहाटे ३ वाजता ती गुपचूप उठली आणि घरातून पळून गेली. तिने मातंग ऋषींचा आश्रम गाठला. तिचा भक्तिभाव पाहून मातंग ऋषींनी तिला आश्रमात प्रवेश दिला. तिने मनोभावे मातंग ऋषींची सेवा केली. प्रसन्न होऊन मातंग ऋषी म्हणाले -योग्य वेळी प्रभुरामचंद्र येतील आणि तुला दर्शन देतील.'

शबरी रोज रामाची वाट पाहू लागली. तिने मनाने सतत रामाचे चिंतन करावे. राम कोणत्याही रस्त्याने येऊ शकतील म्हणून आश्रमाभोवतालचे सगळे रस्ते तिने रोज झाडावेत. राम आले आणि आपण झोपलेलो असलो तर ते तसेच निघून जातील म्हणून तिने २४ तास जागे राहावे. रामासाठी रोज फळे तोडून ठेवावीत.रामाच्या प्रतीक्षेत, रामाच्या चिंतनात, रामाच्या नामस्मरणात तिची अनेक वर्षे निघून गेली. आता शबरी वृद्ध झाली होती. तिला रामाच्या दर्शनाची तीव्र ओढ लागली होती. अखेर एक दिवस प्रभुरामचंद्र आले. त्यांनी शबरीला दर्शन दिले. शबरीने रामाचे पूजन केले. त्या आनंदातच शबरीने त्या दिवशी रामाच्या चरणांवर देह ठेवला.भक्तिमार्गातील शबरी ही देवता ठरली. भिल्ल समाजातील एक सामान्य स्त्री रामचरित्रात अमर ठरली. भक्तीने माणसाच्या जीवनाचे सार्थक होते म्हणून समर्थांनी 'भक्तिपंथेची जावे' असा सल्ला सर्वांना दिला. स्वतः समर्थ रामाची भक्ती करून धन्यता पावले.

# अभाविप : भारतातील सगळ्यात मोठी सशक्त विद्यार्थी संघटना

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषद- एबीव्हीपी स्थापना व राष्ट्रीय विद्यार्थी दिन विशेष

**अखिल** भारतीय विद्यार्थी परिषद- एबीव्हीपी ही एक राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना आहे, ही संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांशी साम्य असलेली संघटना आहे. तीस लाख वीस हजाराहून जास्त सदस्य असलेली ही जगातील मोठी विद्यार्थी संघटना आहे. अ.भा.वि.प. ही उजव्या विचारश्रेणीची भारतीय विद्यार्थी संघटना असून ती रा.स्वं.संघाशी जोडलेली आहे. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विद्यार्थी हितासाठी काम करणारी संघटना आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींची ही सुंदर रोचक संकलित माहिती सदर लेखातून वाचकसेवेत समर्पित... संपादक.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रीय पुनर्निर्माण, सक्षम आणि सशक्त तरुण पिढी घडवण्याच्या उदात्त ध्येयाने दि.९ जुलै १९४९ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास सुरू झाला. कोणत्याही संघटनेसाठी ७५व्या वर्षापर्यंत पोहोचणे ही एक अभिमानास्पद, महत्त्वाची आणि उत्सवाची घटना होय. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संघटनात्मक प्रवासात ही घटना अशा वेळी आली आहे, जेव्हा देशाच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी पर्व सुरू आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा हा प्रवास देशाच्या विकासासोबतच देशासाठी समर्पित सक्षम तरुण पिढी घडवण्याचा आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे स्वरूप ७५व्या वर्षात व्यापक आणि बहुआयामी झाले. मागील वर्षी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची एकूण सदस्यता ४५ लाखांहून अधिक झाली असून, देशभरात २१ हजारांहून अधिक ठिकाणी अभाविपच्या शाखा व संपर्क केंद्र आहेत. हा केवळ आकडा नसून, विद्यार्थी परिषदेचे अखिल भारतीय चारित्र्य स्पष्टपणे समोर आणून ती जागतिक स्तरावरील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना असल्याचे सिद्ध करते. गेली ७४ वर्षे शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर कार्यरत असलेल्या अभाविपच्या सकारात्मक शक्तीने भारतीय शैक्षणिक परिसरांमधून राजकारण, चित्रपट, मीडिया, व्यवसाय, शिक्षण, प्रशासन आदी क्षेत्रांना प्रभावी युवा नेतृत्व दिले आहे. आज या वैविध्यपूर्ण क्षेत्रातील अनेक नाम वंत व्यक्ती आहेत, जे विद्यार्थी जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी सक्रियपणे जोडलेले आहेत.

देशातील आणीबाणीसारख्या मोठ्या संकटाविरुद्ध अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची महत्त्वाची भूमिका आणि योगदानासोबतच लहान-मोठ्या प्रमाणात अशी अनेक उदाहरणे आहेत, जेव्हा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली देशातील तरुणांनी सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री राहिलेले आणि सध्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख असलेले सुनील आंबेकर अभाविपच्या संकल्पानिमित्त लिहितात की, भारत ही आमची माता आहे, आम्ही पुत्राप्रमाणे देशवासीयांची सेवा करू, या संकल्पासोबत विद्यार्थी परिषदेची स्थापना झाली होती.

विद्यार्थी परिषदेचे कार्यक्षेत्र जरी शैक्षणिक परिसर म्हणजेच कॅम्पस असले, तरी वैचारिक क्षेत्र हे शिक्षणाच्या पलीकडे जाऊन देशहिताच्या प्रत्येक मुद्द्याशी निगडित आहे.ङ्क

अगदी सन १९६१ सालपासून हजारो शिक्षण संस्थेमध्ये अभाविपच्या अनेक शाखांचा सक्रिय सहभाग असल्याचे दिसते. सन १९७०नंतर अभाविपने मोठ्याप्रमाणावर मध्यमवर्गाचे प्रश्न हाताळायला सुरुवात केली, जे इतर डाव्या पक्षांकडुन हाताळले जात होते आणि त्यामध्ये तत्कालिन सरकारची भ्रष्टाचाराबाबतची अनास्था आणि इतर मुद्यांचा सहभाग होता. जेपी.चळवळीम ध्ये आणि त्याभोवतालच्या अनेक निदर्शनांमध्ये अभाविपचा सक्रिय सहभाग होता, त्यांनी त्यासाठी गुजराथ आणि बिहारमधील विद्यार्थी संघटनांबरोबर हातमिळवणी केली होती, आणिबाणीनंतर याच सगळ्या कामांमुळे अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. सन १९७४नंतर अभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठ्याप्रमाणात वाढ झाली आणि ती १६०,०००च्या वर पोहोचली शिवाय त्यांनी ७९० ठिकाणी आपल्या शाखासुद्धा सुरू केल्या, भारतभरातील अनेक विद्यापिठांमध्ये प्रभावी अस्तित्व निर्माण केले. हीच संख्या १९८३ दरम्यान २५०,०००च्या वर गेली आणि ११००च्यावर शाखा भारतभर उघडल्या गेल्या. सन १९९०च्या बाबरी मशिदीच्या घटनेमुळे आणि नरसिंहराव सरकारने मुक्त बाजाराचे धोरण स्वीकारल्यामुळे मोठ्याप्रमाणावर अभाविप वाढली आणि आता सन २०१६ला त्यांची सदस्य संख्या ३.१७८ लाखाच्या वर पोहोचलेली आहे. त्यामुळे ही संघटना भारतातील सगळ्यात मोठी विद्यार्थी संघटना आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास हा भारतीय मूल्यांनी प्रेरित देशभक्त तरुणांची सक्षम पिढी घडवण्याचा प्रवास राहिला आहे. कोरोना महामारीच्या काळात, देशावर संकट आले असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या नेतृत्वाखाली अनेक तरुणांनी लोकांचे दुःख कमी करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले. हे ताजे उदाहरण आहे, असे अनेक प्रसंग आले आहेत, जेव्हा अभाविपच्या नेतृत्वाखाली तरुणांनी एकत्र येऊन देशातील विविध समस्या सोडवण्यासाठी सर्वप्रथम पुढे आला.

देशातील शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सध्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची हितचिंतक म्हणून आपली भूमिका बजावत आहे. आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विविध शाखा पर्यावरण, सेवा, क्रीडा इत्यादी क्षेत्रातही कार्यरतअभाविपच्या सदस्य संख्येमध्ये मोठी वाढ आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आपला प्रवास सतत नवनवीन विषय आणि क्षेत्रांशी जोडून ठेवला आहे, त्यामुळेच ७५व्या वर्षात पोहोचलेला हा प्रवास कुठेही खडतर किंवा स्तब्ध न राहता सतत गतिमान आणि नव्या क्षेत्रांमध्ये गुंतलेला दिसतो. एकीकडे उर्वरित विद्यार्थी संघटना मर्यादित क्षेत्रात एकाकी आंदोलनापुरत्या मर्यादित असताना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा प्रवास केवळ आंदोलनांपुरता मर्यादित न राहता, शिस्तबद्ध सर्जनशीलतेच्या माध्यमातून तरुणांना जगाशी संबंधित विविध विषयांशी जोडणारा आणि भारतीय मूल्यांशी जोडून सतत गतिमान राहणे व अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणादायी आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा शिस्तबद्ध, भारतीय-केंद्रित विचार मार्गावर गतिमानतेचा प्रवास असाच प्रवाहित राहील, जेणेकरून येर्णाया पिढ्यांना नवीन आव्हानांना तोंड देता येईल आणि राष्ट्र पुनर्निर्माणाचे स्वप्न पूर्ण करता येईल व सक्षम नागरिक म्हणून भारतीय तरुण प्रत्येक क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावू शकतील.

!! सर्व देशवासीयांना अखिल भारतीय विद्यार्थी परिषद स्थापना व राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर, गडचिरोली; जि.गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

# कलाकार शेवटी माणूसच असतो ना...

**सहज** काही चाळता चाळता एक मुलाखत समोर आली, जेणेकरून माझ्याही मनातला एक मोठा गैरसमज दूर झाला. आपण नेहमीच काही छोटे छोटे व्हिडीओ पाहत असतो ज्याच्यात एखादी हीरोइन किंवा हिरो समोरच्या व्यक्तीवर, पत्रकारांवर चिडताना, ओरडताना दिसतात. त्यानंतर त्यांना ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. तीच दृश्य आपल्याला अनेकदा पाहायला मिळतात आणि आपलाही त्यांच्याविषयीचा गैरसमज आणखी वाढत जातो. या छोट्याशा क्लिप्स अगदी दहा सेकंदांपासून तीस-चाळीस सेकंदांपर्यंतच्या असतात. पण त्याच्या आधीची घटना आपल्याला माहीत नसते किंवा ती घटना कापून पुढचा भाग दाखवला जातो जो आपण परत परत पाहत राहतो.

हीरो-हीरोइनची क्रेझ, आकर्षण बहुतेकांना असते. आजच्या काळात त्यांच्या सहीपेक्षा त्यांना फोटो महत्त्वाचा वाटतो. हा फोटो फक्त त्यांचा त्यांना नको असतो, तर त्यांच्याबरोबरीने आपलाही काढलेला फोटो हवा असतो. मीही त्याला अपवाद नाही म्हणा...! तर त्या फोटोसाठी माणसे नेमके काय करतात हे मला या मुलाखतीतून पाहायला मिळाले. ही मुलाखत होती सुप्रसिद्ध अभिनेत्री गिरीजा ओक यांची. एक जवळची व्यक्ती आजारी होती म्हणून त्या हॉस्पिटलम ध्ये गेल्या होत्या. त्या हॉस्पिटलच्या आवारात कोणीतरी त्यांच्याबरोबर फोटो काढावेत, अशी कोणीतरी त्यांना विनंती केली. कलाकार शेवटी माणूसच असतो ना... एक जवळचा व्यक्ती आजारी आहे, हॉस्पिटलमध्ये आहे तेव्हा त्यावेळेसची त्यांची मानसिकता त्यांच्या भावभावनांचा विचार नको का करायला? बरं इथे या उत्साही फोटो काढून घेणाऱ्यांना 'नाही' म्हटले तर ते रागावतात. वाटेल तसे त्या कलाकारांविषयी व्यक्त होतात. गिरीजा ओक यांनी सांगितले की, स्मशानातसुद्धा आपले चाहते फोटो मागतात. त्यांची ही मुलाखत चालू असताना त्यांनी सांगितले की, त्यांच्या पायाला बँडेज आहे कारण फोटो काढण्यासाठी जवळ येताना, धडपडीत त्यांच्या पायावर एका बाईने स्वतःच्या हाय हिल्सचा पाय गिरजा यांच्या नखावर दिला आणि त्यामुळे नख फाटून त्याचे दोन भाग झाले. त्यांनी हे त्या व्यक्तीला कळूसुद्धा दिले नाही कारण तिने जाणीवपूर्वक केलेले ते कृत्य नव्हते त्यामुळे तिची चूक नव्हती. तिला बोलण्यात अर्थ नव्हता. ही घटना घडताना आणि घटना घडून गेल्यावरसुद्धा ती व्यक्ती याविषयी अनभिज्ञ होती की गिरीजाच्या पायाला तिच्यामुळे दुखापत झाली आहे.

गिरीजा ओक यांनी पुढे सांगितले की, जेव्हा काही माणसे आपल्यासोबत फोटो काढण्यासाठी येतात तेव्हा त्यांचे केस ओढले गेलेले आहेत, साडीवरच्या पिना निघालेल्या आहेत, साडीचा पदर खेचला जाऊन साड्या फाटलेल्या आहेत. त्या क्षणी आपल्याला कितीही त्रास झाला तरी कलाकार म्हणून समाज आपल्याकडे पाहात असतो तेव्हा आपल्याला बोलता येत नाही. आसपास गर्दी असते. नेमके कोणाकडून हे घडलेलं आहे हे त्यांना आणि आपल्यालाही कळत नाही. अशा क्षणी चिडून मला कोणाला भेटायचं नाही असे म्हटले किंवा माझ्या सुरक्षिततेची काळजी मला वाटली तर या मी माज का दाखवतीये, हे लोकांनी लक्षात घ्यायला पाहिजे! हे जे माझ्याबाबतीत घडते ते इतरही कलाकारांबाबतीत घडत असते. त्यामुळे कलाकार चिडतात किंवा चिडून एखादा कमी जास्त शब्द बोलतात, एवढीच गोष्ट व्हायरल होते पण ते का तसे वागतात हे कधीच समाजासमोर येत नाही.गिरीजा ओक यांनी अत्यंत साध्या शब्दांत प्रामाणिकपणे कलाकारांची बाजू मांडलेली आहे यातून खरोखरी आपण बोध घेतला पाहिजे!

मला आठवतेय, एका हॉटेलमध्ये रात्री साधारण साडे दहा-पावणे अकराच्या सुम ारास आम्ही कॉफी प्यायला गेलो होतो. तिथे हिंदी सिनेमा सृष्टीतील एक दिग्गज अभिनेता आपल्या पत्नी आणि मुलांसह शांतपणे बसून भोजन करत होते. अचानक एक मुलींचा गलका त्यांच्याकडे गेला आणि त्यांनी या अभिनेत्यांशी बोलायला सुरुवात केली. ती वेळ खरं तर त्यांची स्वतःची वेळ होती, आपल्या कुटुंबीयांना द्यायची वेळ होती. मुख्य म्हणजे एखादा माणूस अन्न चावतोय अशा विचित्र स्थितीमध्ये त्या मुलींचा मित्र या आपल्या मैत्रिणींचा त्याच्यासोबतीचा फोटो काढायचा प्रयत्न करत होता. त्यांनी या मुलींना सांगितले की, कृपया मी जेव्हा घास चावतोय तेव्हा तरी कमीत कमी तुम्ही फोटो काढू नका. माझे जेवण होऊ द्या, मग तुम्ही माझ्याबरोबर हवे तेवढे फोटो काढा. तरीही समोरच्याचे फोटो काढणे चालूच होते आणि या मुलींचे उगाचच त्यांना चिकटणे! त्यांची पत्नी प्रचंड चिडली आणि ती म्हणाली, आम्हाला थोडा वेळ आमच्याही आनंदासाठी मिळू द्या की...! हे कदाचित त्या मुलींनी ऐकले; परंतु एका टेबलाभोवती अनेक मुली जमल्या आहेत आणि फोटोसेशन चालू आहे पाहून त्या हॉटेलम धील इतर कुटुंबीयसुद्धा आपापले मोबाईल सरसावून तिथे फोटो काढण्यासाठी पोहोचले. आत्तापर्यंत जो या मुलींशी संवाद चालू होता तो कोणीच ऐकलेला नव्हता त्यामुळे त्यांना त्याविषयीची काहीच माहिती नव्हती. प्रत्येक वेळेस नव्याने, नवीन लोकांना ही माहिती देणे त्यांच्यासाठी शक्य नव्हते. थोडा वेळ आनंदाने घालवण्यासाठी ते तिथे आलेले होते; परंतु त्यांच्या आनंदावर या सगळ्या माणसांनी विरजण टाकलेले होते. शेवटी ते अर्धवट झालेल्या जेवनातून, ताटावरून उठून निघून गेले. ते जातानासुद्धा काही माणसे त्यांच्या आसपास पळत पळत ज्या कोनातून फोटो मिळतोय त्या कोनातून ते काढत होते.


प्रत्येक कलाकाराला स्वतःचे स्वतंत्र आयुष्य असते, ते त्यांना त्यांच्या पद्धतीने मिळायलाच हवे. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याची कृती त्यांच्या चाहत्यांनी कृपया करू नये आणि हे सांगण्याची वेळ, कमीत कमी त्यांच्यावर येऊ नये, एवढी सगळ्यांनी काळजी घ्यावी.

**- प्रा. प्रतिभा सराफ**

# आनंदलहरी भाग-१५७

**जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें ।।**
**परीं कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये ।।**

मोह माणसाला उच्च पातळीवरुन नको त्या स्तरापर्यन्त कसे आणतो याचे स्पष्टीकरण माऊली करीत आहेत. मोहामध्ये माणूस स्वत:चे अस्तित्व विसरुन जातो. अस्तित्वच काय, स्वत:चे सर्वस्व हरुन जातो. मोह हे एक असे शस्त्र आहे की ते समोरच्यावर वार न करता स्वत:वर वार करण्यास भाग पाडते. अर्जुन युध्द करण्याच्या मानसिकतेने रणभुमीवर उतरला आहे. कोणाशी युध्द करावे लागणार आहे याचे त्याला पूर्वीच ज्ञान होते. असे असतांनाही प्रत्यक्ष रणभूमीत उतरल्यानंतर शत्रुपक्षाला पाहून अर्जुनाला मोह निर्माण व्हावा हे आश्चर्य वाटण्यासारखे आहे. मानवी जीवनातही असे अनेक प्रसंग घडत असतात, पण याचे माणसाला आश्चर्य वाटत नाही हे विशेष. माणसाला वाटते की, मी केलेले योग्यच आहे. पत्नी, पती, पुत्र किंवा ईतर जे कोणी असतील त्यांच्या प्रेमापोटी माणूस मोहग्रस्त होतो व हातून नको ते घडत आहे हे त्याला मोहाच्या पडद्याने दिसत नाही. मात्र एके दिवशी त्याचे विपरित परिणाम भोगण्याची वेळ त्याच्यावर येते. मी मी म्हणणारा माणूस कारणवश मोहग्रस्त झाला तर स्वत:चे अस्तित्व संपल्याचेही त्याला भान कसे राहात नाही याची अनेक उदाहरणे आपण पाहातो. मोह माणसाचा सर्वनाश कसे करतो याचे सुंदर स्पष्टीकरण माऊलींनी केले आहे. भ्रमर कठीणातले कठीण लाकूड सहज कोरु शकतो. पण कमळाच्या गाभ्यात बसुन कमळाचा स्वाद घेतांना कमळ मिटत असल्याचे विसरतो. त्या कमळाला पोखरुन बाहेर पडावे असेही त्याला वाटत नाही आणि कमळाच्या गाभ्यात तो अडकून पडतो. त्यात त्याचे सर्वस्व संपते.



माऊलींची ही ओवी आम्हाला भरपूर काही देऊन जाते. मी-मी म्हणणारे लोक किंवा समाजात ज्यांनी लौकिक मिळवला आहे, असे महान व्यक्तीमत्व असलेले मान्यवर सुध्दा बऱ्याच वेळा मोहग्रस्त होऊन स्वत:चे अस्तित्व लयास घेऊन गेलेले आपण पाहातो. समाजाचा आदर्श किंवा आशास्थान असणाऱ्या माणसांकडून जेव्हा मोहग्रस्त होऊन बेधुंद वागण्याच्या घटना घडतात तेव्हा समाजाला मोठा धक्का बसतो. मोठया माणसांच्या मोहग्रस्त होऊन वागण्याचा धक्का समाजाला बसत असेल. पण आपल्या सारख्या सामान्य माणसाच्या मोहापोटी बेधुंद वागण्याने किमान आपल्या संसाराला, आपल्या अस्तित्वाला तरी धक्का बसत असेल, याचा विचार आपण का करु नये ? आपण सुध्दा समाजाचे एक घटक आहोत म्हणून आपण मोहग्रस्त होऊन वागलो तर त्याचा विपरित परिणाम आपल्याबरोबर समाजावरही होतो याचा विचार करायला हवा. स्वत:वर व समाजावर विपरित परिणाम करण्याचा अधिकार कोणालाही नाही याची जाणीव सर्वांना राहावी अशी अपेक्षा माऊलींच्या या ओवी संदर्भाने केली तर योग्य होईल. मनुष्य देहाची महती आपणाला कळली तर चुकीचे पाऊल पडण्याचे कारणच नाही. आपले योग्य पाऊल नेहमी वाढत्या आनंदलहरीकडे नेणारे ठरु शकते. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# राज्यातील सर्व मॉलमधील गेमिंग झोनचे ऑडिट होणार; मंत्री उदय सामंत यांची घोषणा

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - मुंबईसह राज्यातील सर्व मॉलमधील गेमिंग झोनमध्ये नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या सुरक्षेचे निकष काटेकोरपणे पाळले जात आहेत का, याचा व्यापक आढावा घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील सर्व गेमिंग झोनचे सविस्तर सुरक्षा आणि फायर ऑडिट करण्याचे निर्देश संबंधित महानगरपालिका आयुक्तांना दिले जातील, अशी घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी विधानपरिषदेत केली. या राज्यव्यापी आढाव्याचा सविस्तर अहवाल आगामी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईतील मॉल्समधील सुरक्षेचे निकष न पाळणाऱ्या गेमिंग झोनविरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत नियम ९२ अन्वये आमदार उमा खापरे यांनी सभागृहात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते. या चर्चेत आमदार परिणय फुके आणि अमित गोरखे यांनीही सहभाग घेतला. मुंबईतील मॉलच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना मंत्री सामंत म्हणाले की, मुंबईतील ६८ मॉलची प्रशासनामार्फत प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ४७ मॉलमध्ये आवश्यक ती अग्निसुरक्षा यंत्रणा योग्य स्थितीत आढळून आली.

मात्र, १८ मॉलमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर त्रुटी आढळल्याने त्यांना १२० दिवसांची कायदेशीर नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर संबंधित मॉल चालकांनी स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्शन यंत्रणेसह आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपायांची पूर्तता केल्यानंतरच त्यांना पुन्हा परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित तीन मॉल सध्या बंद असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाईचा प्रश्न उद्भवला नाही, असे त्यांनी नमूद केले.

### दरवर्षी फायर ऑडिट सक्तीचे करणार

गेमिंग झोनमधील बालकांच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत मंत्री सामंत यांनी फायर ऑडिट अधिक प्रभावी करण्यासाठी नियमांचा आढावा घेतला जाईल, असे सांगितले. सध्या असलेल्या नियमांनुसार दर दोन वर्षांऐवजी आता 'दरवर्षी' फायर ऑडिट सक्तीचे करण्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल करण्याबाबत सरकार प्रयत्नशील आहे. याशिवाय, गरज भासल्यास थर्ड पार्टीमार्फत मॉल्सचे अचानक फायर ऑडिट करण्याबाबतही संबंधित आयुक्तांशी चर्चा केली जाईल. गेमिंग झोनमध्ये एखादी दुर्दैवी घटना घडल्यास मुलांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी म ॉल्समध्ये आवश्यक त्या आपत्कालीन वैद्यकीय सुविधा सज्ज ठेवण्याचे निर्देश मॉल व्यवस्थापनाला दिले जातील, असेही मंत्र्यांनी स्पष्ट केले.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत; शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी)- नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, पूर, दुष्काळ, वादळ तसेच इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, पात्र शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना स्वेच्छेने सहभागी होता येणार आहे. मात्र, यासाठी अऋठखडढअउघ ऋरीशी खऊ असणे तसेच डिजिटल पीक सर्वेक्षण (Digital Crop Survey - DCS) अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकराराची माहिती पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील. योजनेत सहभागी होण्यासाठी प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट ठेवण्यात आली आहे. विमा हप्ता म्हणून खरीप हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांना केवळ दोन टक्के, रब्बी पिकांसाठी दीड टक्का, तर नगदी पिकांसाठी पाच टक्के हिस्सा भरावा लागणार आहे. उर्वरित विमा प्रीमियम शासनाकडून भरला जाणार आहे.

खरीप हंगामात पेरणीनंतर काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आपत्ती किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे उत्पादनात घट झाल्यास पीक कापणी प्रयोग अथवा तांत्रिक उत्पादन मूल्यांकनाच्या आधारे नुकसानभरपाई दिली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळून शेती व्यवसायातील जोखीम कमी होण्यास मदत होणार आहे.

शासनाने योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणण्यासाठी काही महत्त्वाच्या अटी लागू केल्या आहेत. चुकीची माहिती देऊन अथवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्याला पीक विमा योजनेसह कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांपासून पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्यात येणार आहे.

योजनेसाठी अर्ज करताना जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधारशी संलग्न बँक खाते तसेच AGRISTACK Farmer ID आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने सर्व पात्र शेतकऱ्यांना अंतिम मुदतीची वाट न पाहता ३१ जुलैपूर्वीच अर्ज सादर करून सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# माजी सैनिकांना सेना आयुध कोर वर्धापन दिन सोहळ्यात सहभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.९(जिमाका)- ए.ओ. सी. सेंटर सिकंदराबाद येथे सेना आयुध कोरचा १२ वा वर्धापन दिन दि.२ ते ५ डिसेंबर २०२६ दरम्यान साजरा होणार आहे. ए.ओ.सी. मधील माजी सैनिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नंदनवन कॉलनी, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर. (दूरध्वनी ०२४०-२३७०३१३) येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय बाजारात तेल निम्म्या भावात, भारतात पेट्रोल दुप्पट दरात!

**२००८ साली,** डॉ. मनमोहन सिंग यांच्या राजवटीत, जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १३२ ते १४२ डॉलर या ऐतिहासिक उच्चांकावर होती, तेव्हा १ डॉलर म्हणजे ४३ रुपये असल्याने भारत सरकारला कच्च्या तेलासाठी प्रति लिटर ३६ ते ३८ रुपये मोजावे लागत होते, पण जनतेला पेट्रोल ५०-५१ रुपये प्रति लिटर दराने पुरवले जात होते.

याच कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल केवळ ७० ते ७२ डॉलर आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन होऊनही, सरकार तेलासाठी प्रति लिटर ४०-४१ रुपये देत आहे, तर जनतेकडून प्रति लिटर १११ ते ११२ रुपये आकारले जात आहेत.

या विलक्षण आणि चमत्कारिक 'अमृतकली' अर्थशास्त्रातील क्रूर विरोधाभासामुळे, सध्याचे शासक आणि त्यांच्या आंधळ्या समर्थकांच्या आर्थिक समजुतीचे कठोरपणे विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाची किंमत निम्मी झाली असताना, देशातील नागरिकांचे खिसे पूर्णपणे रिकामे करण्याची ही घटनामालिका खरोखरच ऐतिहासिक आहे.

आज, जुलै २०२६ मध्ये, देशातील पेट्रोल पंपांवर पेट्रोल १११. २२ रुपये आणि डिझेल ९७.८३ रुपये प्रति लिटर दराने विकले जात आहे, तर रिफायनरीमधून मिळणाऱ्या शुद्ध इंधनाची (कच्चे तेल + शुद्धीकरण) वास्तविक किंमत केवळ ४५ ते ४८ रुपये आहे.

उरलेले ५८ ते ६४ रुपये हे निव्वळ केंद्रीय उत्पादन शुल्क, राज्य व्हॅट आणि डीलर कमिशनचा प्रचंड बोजा आहे, जो जनतेवर करांच्या स्वरूपात लादला गेला आहे.

याला विश्वगुरू मॉडेल म्हटले जाते, जिथे जनता आपल्या वाहनांसाठी अर्धा लिटर तेल विकत घेते आणि उरलेले अर्धे तेल सध्याच्या सरकारची आर्थिक भूक भागवण्यासाठी सक्तीने दान करते.

ही लूट लपवण्यासाठी पेट्रोलियम मंत्रालयाच्या धोरणकर्त्यांनी 'कथाकारांची' भूमिका स्वीकारली आहे. माजी पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यापासून ते विद्यमान मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यापर्यंत, त्यांची भूमिका तेलाच्या किमतींचे तर्कशुद्ध व्यवस्थापन करण्यापेक्षा टीव्ही चॅनल्सवर 'जागतिक भू-राजकीय तणाव' आणि 'ओपेक देशांच्या मनमानीपणावर' शोक व्यक्त करण्यापुरतीच मर्यादित राहिली आहे.

जून २०१० आणि ऑक्टोबर २०१४ मध्ये जेव्हा तेलाच्या किमतींवरील नियंत्रण हटवण्यात आले, म्हणजेच त्या बाजारावर सोपवण्यात आल्या, तेव्हा कच्च्या तेलाच्या कमी झालेल्या किमतींमुळे जनतेला थेट फायदा होईल, असे मोठे दावे करण्यात आले होते. परंतु वास्तव हे आहे की, जेव्हा जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने घसरल्या, तेव्हा केंद्र सरकारने लवचिक पट्ट्याप्रमाणे केंद्रीय उत्पादन शुल्क इतके वाढवले की जनतेला एक पैशाचाही दिलासा मिळाला नाही.




सध्याच्या सरकारचे आंधळे समर्थक अनेकदा १.३४ लाख कोटी रुपयांच्या 'ऑइल बॉण्ड्स'वर शोक व्यक्त करून मनमोहन सिंग सरकारवर टीका करतात, जे या शतकातील सर्वात मोठे बौद्धिक दिवाळे आहे.

अधिकृत आर्थिक आकडेवारी साक्ष देते की, मोदी सरकारने आपल्या कार्यकाळात केवळ पेट्रोल आणि डिझेलवर केंद्रीय उत्पादन शुल्क आणि विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क (उपकर) लादून जनतेच्या खिशातून २५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी रक्कम वसूल केली आहे.

१.३४ लाख कोटी रुपयांच्या पूर्वीच्या कर्जाचे भूत उभे करून जनतेकडून २५ लाख कोटी रुपये उकळणे हा न्याय नसून लूट आहे.

डॉ. मनमोहन सिंग यांची धोरणे निश्चितच 'मौन' होती, पण ती गरीब आणि मध्यम वर्गीयांसाठी 'बोलकी दिलासा' होती. ज्या अर्थसंकल्पावर स्वतः वित्तीय तुटीचा भार होता, त्याने लोकांची क्रयशक्ती कमी होऊ दिली नाही. हा कसला राष्ट्रवाद आहे, जिथे आंतरराष्ट्रीय मंदीचा फायदा देशाच्या १.४ अब्ज नागरिकांपर्यंत पोहोचण्याऐवजी, तो थेट सरकारची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आणि मोठ्या कॉर्पोरेट मित्रांना कर सवलती देण्यासाठी वापरला जातो?

जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या होत्या, तेव्हा दिलासा प्रत्यक्ष जमिनीवर होता; आज, जेव्हा कच्च्या तेलाच्या किमती कमी आहेत, तेव्हा किमती गगनाला भिडत आहेत. आकडेवारीतील खरा कडवटपणा आणि सध्याच्या सरकारचे प्रशासकीय अपयश, यामुळेच देशाची अर्थव्यवस्था एक तमाशा बनली आहे. जे काल पेट्रोलच्या ५० रुपयांच्या दरावर शोक व्यक्त करत होते, तेच आता पेट्रोलच्या ११२ रुपयांच्या दराला 'राष्ट्रउभारणी कर' म्हणत त्याचे कौतुक करत आहेत.

ही या युगातील सर्वात मोठी वैचारिक आणि आर्थिक विडंबना आहे.

**पंकज कुमार जाट यांच्या लेखाचा मराठी अनुवाद.....**

# कर्जमुक्ती योजनेत पारदर्शक कार्यपद्धती; शेतकऱ्यांनी अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जातून दिलासा मिळणार असून, योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सध्या वेगाने सुरू आहे.




या योजनेची संपूर्ण कार्यपद्धती सुलभ, सोपी आणि पूर्णपणे पारदर्शक असून, शेतकऱ्यांनी कोणत्याही मध्यस्थ अथवा दलालांच्या संपर्कात न राहता, ज्या बँक, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, कृषी पतसंस्था किंवा सहकारी बँकेकडून कर्ज घेतले आहे, त्या संस्थेशी थेट संपर्क साधावा.

योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित बँकेतील आपल्या कर्ज खात्याची माहिती अद्ययावत असल्याची खात्री करून घ्यावी.

कर्ज खाते क्रमांक, कर्जाची रक्कम, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, बँक खाते आणि इतर तपशील अचूक असणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेने मागणी केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर केल्यास पुढील प्रक्रिया सुरळीत पार पडणार आहे.

यासाठी आधार कार्ड, आधारशी संलग्न बँक खाते, बँक पासबुक, कर्ज खात्याचा तपशील, सातबारा (७/१२), ॲग्रीस्टॅक नोंदणीची माहिती, ई-केवायसी विशेषतः आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी या दोन बाबी महत्वाच्या आहेत. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅकवर नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी.

शेतकऱ्यांनी केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि कोणत्याही अफवा, दिशाभूल करणारे संदेश किंवा अवैध दाव्यांना बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या कर्जमुक्ती प्रक्रियेबाबत नियमितपणे संबंधित बँकेशी संपर्क ठेवावा.

आवश्यक कागदपत्रे केवळ अधिकृत संस्थेकडेच जमा करावीत. कोणत्याही अनोळखी व्यक्ती, एजंट किंवा दलालाकडे वैयक्तिक माहिती अथवा कागदपत्रे देऊ नयेत.

शासन, संबंधित बँका, कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन केल्यास कर्जमुक्तीची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शकपणे पूर्ण होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पावसाळ्यात प्रशासनाच्या विविध विभागाचे कर्तव्य

पाऊस, वादळ वारा, पूर, झाडे उन्मळून पडणे,दरड कोसळणे, रस्ते वाहून जाणे, वीज सेवा खंडित होणे या बाबीपासून सुरक्षित राहण्यासाठी प्रशासनाच्या सर्व विभागानी व नागरिकांनी ही सतर्क राहिल्यास जीवित हानी निश्चितच थांबू शकते. प्रशासनाच्या पालिका विभागातील स्वच्छता विभागाने व ग्रामीण भागातील नगर पंचायत किंवा ग्राम पंचायतीच्या स्वच्छता विभागाने गटारीत तुंबलेला कचरा काढून गटारी किंवा जमिनी खालील गटारी मोकळ्या केल्या तर पावसाचे पाणी तुंबणार नाही व पाण्याचा निचरा चटकन होईल यामुळे घरात पाणी शिरणार नाही.

मोडकळीस आलेल्या घर मालकांना सूचना देऊन ती घरे तात्काळ खाली करून घ्यावी. शहर व ग्रामीण भागात उंचच उंच झाडे, किंवा धोकादायक झाडे यांची छाटणी करावी. वीज वितरण विभागाने ढिले झालेले विजेचे खांब बदलावे,विजेच्या तारांजवळ

झाडाच्या वाढलेल्या फांद्या तोडाव्यात, पावसाळ्याच्या दिवसात वीज खांबात वीज प्रवाह उतरतो म्हणून एक निरीक्षक पथक नेमून पाहणी करावी.रस्त्यांच्या कडेला मोठं मोठ्या खड्यात पाणी तुंबलेले असते, या मुळे दोन चाकी वाहन अपघात होऊ शकतो, हे साचलेले पाणी त्वरित काढावे व खड्डे बुजवावे,जलसंपदा व पाटबंधारे खात्याने धरणाच्या क्षमतेचा वारंवार आढावा घ्यावा,धरणातील पाणी सोडण्याआधी नदी किंवा ओढ्यांच्या काठावरील रहिवाश्यांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात.शासनाची संपर्क यंत्रणा

पोलीस,ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक ,पोलीस पाटील,कोतवाल यांना सतर्क राहण्यास सांगून गंभीर परिस्थिती उदभवल्यास त्वरित वरीष्ठाशी तालुका व जिल्हा संपर्क साधण्याच्या सूचना यांना द्याव्यात.

स्वयं सेवी व सेवा भावी संस्था,मंडळे, समाज कार्यकर्ते यांनी ही पावसाने गंभीर स्थिती निर्माण झाल्यास मदतीसाठी पुढे यावे. शासनाच्या आरोग्य विभागाने ही आपत्कालीन स्थिती उदभवल्यास सतर्क रहावे. एस. टी.महामंडळच्या बसेस चालकांनी पुलावरून पाणी वाहत असतांना आततायी किंवा उताविळपणा व अति आत्मविश्वास दाखवून बस पुराच्या पाण्यातून नेण्याचा प्रयत्न करू नये.

काही शौकीन सेल्फी काढण्यासाठी पुराच्या पाण्याला पाहण्यासाठी नदी काठी जातात,धबधबा पाहण्यासाठी डोंगर ,दऱ्याच्या ठिकाणी जातात व तेथे सेल्फी काढतात, व सेल्फी किंवा रिल्स बनविण्याच्या नादात पाण्यात पडतात व प्रवाहासोबत वाहून जातात. असे प्रकार टाळायला हवे. ही सर्व खबरदारी घेतली तर जीवित हानी टळू शकते.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# भ्रष्टाचाराचे आरोप असलेले परिवहन अधिकारी सक्तीच्या रजेवर

## मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा; पारदर्शक चौकशीसाठी आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - परिवहन विभागातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या आरोपांची आम्ही गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आजपासूनच तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येत असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी विधानसभेत केली. परिवहन विभागात भ्रष्टाचाराला जागा नाही. चालू असलेल्या चौकशीवर या अधिकाऱ्यांचा कोणताही प्रभाव पडू नये आणि सत्य बाहेर यावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, चौकशीसाठी आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे मंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचार आणि आरटीओ अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, 'परिवहन खात्यातील काही अधिकाऱ्यांवर चौकशी सुरू असतानाही, तेच अधिकारी पुन्हा त्याच पदांवर राहून आपले गैरव्यवहार आणि जुने धंदे सुरू ठेवत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची तेथून तात्काळ बदली करण्यात यावी आणि त्यांना तातडीने सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी', अशी मागणी त्यांनी केली.

विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या या मुद्यावर उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, आरटीओ विभागातील कथित गैरव्यवहारांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत आधीच सखोल चौकशी सुरू आहे. वडेट्टीवार यांनी केलेल्या आरोपांची आणि पुराव्यांची गांभीर्याने दखल घेत, प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र भुयार, मोटार वाहन निरीक्षक योगेश मोरे आणि मोटार वाहन निरीक्षक गणेश विघ्ने यांना आजपासूनच सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे आदेश सरकारने जारी केले आहेत.

**दोषी आढळल्यास कठोर कारवाई**

मंत्र्यांनी सभागृहाला आश्वस्त केले की, राज्य सरकारने भ्रष्टाचाराविरोधात 'शून्य सहनशीलता' (झिरो टॉलरन्स) धोरण स्वीकारले असून कोणत्याही दोषी अधिकाऱ्याला पाठीशी घातले जाणार नाही. आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत होणारी ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर जे कोणी अधिकारी यात दोषी आढळतील, त्यांच्यावर कोणतीही दया न दाखवता कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई केली जाईल. राज्याच्या परिवहन व्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि जनविश्वास अबाधित ठेवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, भ्रष्टाचाराविरोधातील ही मोहीम भविष्यातही अशीच कठोरपणे सुरू राहील, असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# मावळातील प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी आदेश लागू

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची वाढती गर्दी, संभाव्य अपघात तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील प्रमुख पर्यटनस्थळांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा आदेश ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार मावळ तालुक्यातील मौजे लोणावळा परिसरातील भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, तुंग किल्ला, टायगर पॉईट, लायन्स पॉईट , शिवलिंग पाईन्ट, एकविरा देवी कार्ला लेणी तसेच पवना धरण परिसर या प्रमुख पर्यटनस्थळांवर बंदी आदेश लागू करण्यात आली आहेत. पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी जाणे, पाण्यात उतरणे, वाहतूक कोंडी, सार्वजनिक शांततेचा भंग आणि अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने ही प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे. प्रशासनाने पर्यटकांना आदेशातील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले असून, धोकादायक कडे, धबधबे आणि पाणीसाठ्यांच्या परिसरात सुरक्षिततेची काळजी घेण्यास सांगितले आहे. तसेच प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ तसेच इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणादायी - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांना शिक्षण, सन्मान, समान संधी आणि न्याय मिळावा यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. डॉ. आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी येथे केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यपालांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आपल्याला समाजातील विषमता, जातीयवाद, उच्च-नीचतेची भावना तसेच स्त्री-पुरुष भेदभाव मिटवण्याचा संदेश देतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम आणि सशक्त व्हावी यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाला समान संधी आणि आत्मसन्मान देणारा भारत घडविणे हीच डॉ. आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल.

'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी तसेच भारताला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकास सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटक विकासाच्या प्रवाहात सहभागी झाल्यास हे ध्येय सध्या होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे व उद्योजक पद्मश्री डॉ. अशोक खाडे यांना सोसायटीतर्फे देण्यात येणारा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्याबाबत राज्यपाल म्हणाले की, समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केल्याने इतरांनाही उत्कृष्ट कार्य करण्याची; तसेच राष्ट्र आणि समाजकार्याला वाहून घेण्याची प्रेरणा मिळते. अशा पुरस्कारांमुळे समाजात सकारात्मक विचार, परिश्रमाची वृत्ती आणि राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ होते.

कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रामदास आठवले, भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो, सोसायटीचे विश्वस्त. ॲड. उज्ज्वल निकम, विश्वस्त ॲड. बी. के. बर्वे, डॉ. वेंकट स्वामी व अरविंद सोनटक्के, सोसायटीचे सचिव डॉ. वासुदेव गाडे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सोसायटीच्या कार्यकारिणीचे सदस्य चंद्रशेखर कांबळे तसेच पुरस्काराचे मानकरी उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# सिगारेट पिण्यास मज्जाव केल्याने पत्नीसमोरच वृद्धाचा चाकू भोसकून खून! अल्पवयीन मारेकरी अटकेत

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- शहरातील मुकुंदवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या छत्रपतीनगर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक गुन्हेगारीची घटना समोर आली आहे. आपल्या घरासमोरील ओट्यावर बसून सिगारेट पिण्यास आणि शिवीगाळ करण्यास विरोध केल्याच्या किरकोळ कारणावरून एका ५५ वर्षीय व्यक्तीचा शेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलाने चाकूने सपासप वार करून निर्घृण खून केला. रोहिदास दत्तु खकाळ (वय ५५ वर्षे, रा. छत्रपतीनगर, मुकुंदवाडी) असे मृत पावलेल्या दुर्दैवी व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी मृत व्यक्तीच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी रात्रीतूनच अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे.

पोलीस सूत्रांकडून आणि दाखल एफआयआरवरून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राणी रोहिदास खकाळ (वय ५० वर्षे) या पतीसह छत्रपतीनगर भागात राहतात. ८ जुलै २०२६ रोजी रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराबाहेर फटाके वाजवण्याचा आवाज आल्याने त्यांनी बाहेर पाहिले असता, समोर राहणारा शेजारील अल्पवयीन मुलगा फटाके फोडताना दिसला. यावरून महिनाभरापूर्वीही त्यांचे जुने भांडण झाले होते. त्यानंतर बुधवारी रात्री ९:१५ वाजण्याच्या सुमारास खकाळ दांपत्य घरात टीव्ही बघत असताना त्यांच्या घराचा दरवाजा कोणीतरी ठोठावला. रोहिदास खकाळ यांनी दरवाजा उघडला असता समोर तोच अल्पवयीन मुलगा उभा होता.

तो अल्पवयीन मुलगा घराच्या ओट्यावर बसून मोठ्या मोठ्याने शिवीगाळ करत सिगारेट ओढू लागला. त्याला रोहिदास यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, 'तू इथे बसून सिगारेट पिऊ नको, घरी जा.' मात्र तो अधिकच आक्रमक झाला. परिसरातील दुकानदार शिंदे यांनीही त्याला समजावले. मात्र, काही वेळाने तो निघून गेल्याचे भासवत अचानक घरासमोरील तुळशीच्या पाठीमागून ओट्यावर चढला. त्याने आपल्या जवळील धारदार चाकू काढून रोहिदास खकाळ यांच्या पाठीवर ३ ते ४ गंभीर वार केले. या हल्ल्यामुळे रोहिदास ओट्यावरून खाली कोसळले. ते खाली पडताच संशयित नराधमाने त्यांच्या पोटात पुन्हा ३ ते ४ वेळा चाकू खुपसला.

पतीवर रक्ताळलेला हल्ला होत असल्याचे पाहून पत्नीने आरडाओरडा केला. गल्लीतील किशोर सिताराम राठोड आणि दिलीप बाबासाहेब शिंदे यांनी धाव घेत आरोपीला थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो वार करून तेथून पळून गेला. नातेवाईक आणि गल्लीतील लोकांनी गंभीर जखमी रोहिदास खकाळ यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात नेले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा करुण मृत्यू झाला. हत्येची माहिती कळताच सहाय्यक पोलीस आयुक्त मनीष कल्याणकर, मुकुंदवाडीचे पोलीस निरीक्षक विवेक सोनवणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित गांगुर्डे आणि हरेश्वर घुगे यांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अत्यंत तत्परतेने शोधमोहीम राबवून रात्रीतूनच त्या अल्पवयीन मारेकऱ्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास एपीआई रोहित गांगुर्डे करत आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; रविवारी आकाशवाणीवर जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांची विशेष मुलाखत



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना शासनाने जाहीर केली असून शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी प्रशासकीय उपाययोजना सुरु झाल्या आहेत.या योजनेची सविस्तर माहिती देण्यासाठी जिल्हा उपनिबंधक(सहकारी संस्था) समृत जाधव यांची विशेष मुलाखत आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन रविवार दि.१२ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी प्रसारित होणार आहे.

या मुलाखतीत समृत जाधव यांनी या योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेची संपूर्ण माहिती दिली आहे. त्यांच्याशी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी बातचीत केली आहे.

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरचे कार्यक्रम अधिकारी सुजीत बनसोडे हे या कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. ही मुलाखत अत्यंत उद्बोधक व माहितीपुर्ण असून शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती प्रक्रिया जाणून घेण्यासाठी अवश्य ऐकावी. श्रोत्यांना एफ. एम. १०१.७ Mhz या वाहिनीवर ही मुलाखत ऐकता येईल आणि News on AIR ॲप वर ही मुलाखत देशभरात कोठेही ऐकता येणार आहे.

## महानगरपालिकेतर्फे कर वसुली मोहीम
## सलग चौथ्या आठवड्यात एकाच दिवसात १३ मालमत्ता सील तर रु.३९.३५ लक्ष एवढा कर वसूल

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- कर वसुली मोहिमेस मागील आठवड्यात मिळालेल्या प्रतिसादानंतर महापालिका आयुक्त श्री अमोल येडगे यांच्या आदेशानुसार आज दिनांक ०९ जूलै रोजी महापालिकेच्या सर्व १० झोन अंतर्गत पुन्हा एकदा कर वसुली मोहीम राबवण्यात आली. यात आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे व उप आयुक्त श्री विकास नवाळे यांनी सर्व १० झोन मधे प्रत्येकी १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी कार्यवाहीसाठी नेमून देण्यात आली होती. त्यावर आज झोन निहाय कर वसुली पथकांनी कार्यवाही केली.

**झोन निहाय कार्यवाही**
* झोन ३ सील मालमत्ता १
* झोन ५ सील मालमत्ता २ कर वसूल १५.७७ लाख
* झोन ६ सील मालमत्ता २ कर वसूल रु ७.०८ लाख
* झोन ७ कर वसूल रु. २.०० लाख
* झोन ९ सील मालमत्ता - २
* झोन १० सील मालमत्ता ६ कर वसूल रु.१४.५० लाख
* **एकूण सील मालमत्ता १३ कर वसूल रु.३९.३५ लाख**

## आज सकाळी कोणत्याही परिस्थितीत पंपिंग सुरू झालीच पाहिजे: आयुक्त अमोल येडगे यांचे कडक निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- 'कोणत्याही परिस्थितीत उद्या सकाळी ११ ते १२ वाजेच्या दरम्यान पाणी पुरवठ्याची पंपिंग सुरू झालीच पाहिजे. कामात आता कोणतीही दिरंगाई किंवा सबबी खपवून घेतल्या जाणार नाहीत,' अशा कडक शब्दांत महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित एजन्सी आणि अधिकाऱ्यांना आज तंबी दिली.

आज स्मार्ट सिटी कार्यालयात आयुक्त अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली पाणी पुरवठ्याचा सखोल आढावा घेण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने सध्या बंद असलेली पंपिंग आणि जॅकवेल मेंटेनन्सच्या कामावर चर्चा करण्यात आली.

बैठकीत आयुक्तांनी कामाचा वेग वाढवण्यासाठी थेट ॲक्शन प्लॅन' दिला. 'आज संध्याकाळीच एजन्सी, एमजेपीचे अधिकारी आणि महापालिकेच्या अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावी. रात्रीच नवीन व्हॉल्व बदलून पंपिंग सुरू करण्याचे नियोजन करावे. जर रात्री प्रकाशाअभावी काम करणे शक्य नसेल, तर उद्या सकाळी सूर्योदय होताच काम सुरू करा. पण उद्या दुपारी १२ च्या आत पंपिंग सुरू झालीच पाहिजे,' असे आदेश आयुक्तांनी दिले.

बैठकीदरम्यान एजन्सीच्या प्रतिनिधींनी नेहमीप्रमाणे काम रेंगाळण्याची व विलंबाची कारणे देण्याचा प्रयत्न केला. त्यावर आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करत एजन्सीला फटकारले. 'तुमची डेडलाईन आधीच संपली आहे, त्यामुळे आता मला कोणतीही कारणे सांगू नका. आधी काम पूर्ण करा,' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी एजन्सीला सुनावले. तसेच 'एप्रोच चॅनेल'चे कामही तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

**आयुक्तांनी पुढील कामांचे नियोजन करताना खालील महत्त्वाचे निर्देश दिले:**

ऑर्डर ट्रॅकिंगः नवीन व्हॉल्वच्या ऑर्डरची तपासणी करावी आणि ते वेळेतच येतील याचे चोख नियोजन करावे.

जबाबदारीः ज्या ज्या ठिकाणचे व्हॉल्व खराब आहेत, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित एजन्सीची राहील.

५ दिवसांची मुदतः नवीन व्हॉल्व आल्यानंतर ते बदलण्याचे काम पुढील ५ दिवसांतच पूर्ण करावे. नवीन व्हॉल्व आल्यानंतर त्यासाठी रीतसर 'शट डाऊन' घेतला जाईल.

या आढावा बैठकीला विशेष कार्यकारी अधिकारी ए.बी. देशमुख, के.एम. फालक, अतिरिक्त शहर अभियंता अनिल तनपुरे, कार्यकारी अभियंता सचिन वाईकर, सर्व कनिष्ठ अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार रामधन जाधव, योगेश काळे, तसेच जीव्हीपीआरचे सिद्धांत ठाकरे, आशुतोष पांडेय आणि एमजेपी चे राम नारायण आदी अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

## कर्नाटकहून आणलेल्या सिद्धार्थ उद्यानातील 'सुचित्रा' सिंहिणीचा मृत्यू!

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- पर्यटकांचे हक्काचे ठिकाण असलेल्या येथील सिद्धार्थ उद्यान व प्राणीसंग्रहालयातून प्राणिप्रेमींसाठी एक अत्यंत अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी बातमी समोर आली आहे. प्राणीसंग्रहालयात अवघ्या दहा महिन्यांपूर्वी दाखल झालेल्या आणि बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेल्या 'सुचित्रा' नावाच्या सिंहिणीचा बुधवारी रात्री गंभीर आजाराने मृत्यू झाला आहे. प्राणीसंग्रहालयाचे प्रभारी पशुधन अधिकारी डॉक्टर संजय नंदन यांनी या धक्कादायक घटनेला अधिकृतपणे दुजोरा दिला आहे. सुचित्राच्या या अकाली मृत्यूमुळे प्राणीसंग्रहालयातील कर्मचारी आणि नियमित भेट देणाऱ्या प्राणिप्रेमी नागरिकांमध्ये मोठी हळहळ व शोककळा पसरली आहे.

या दुःखद घटनेची सविस्तर पार्श्वभूमी अशी की, केंद्र सरकारच्या प्राणिआदान-प्रदान योजनेअंतर्गत सुमारे १० महिन्यांपूर्वी कर्नाटक राज्यातील प्रसिद्ध 'शिवमोग्गा' प्राणिसंग्रहालयातून सिंह, अस्वल आणि कोल्ह्याची विशेष जोडी छत्रपती संभाजीनगरात आणण्यात आली होती. या नव्या पाहुण्यांमुळे उद्यानाच्या वैभवात मोठी भर पडली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या जोडीतील सिंहिण सुचित्रा हिची तब्येत अचानकपणे कमालीची खालावली. पोटातील गंभीर संसर्गामुळे तिला असह्य वेदना होत होत्या. तिची प्रकृती इतकी खालावली होती की, गेल्या दोन दिवसांपासून तिने अन्नाचा एक कणही घेतला नव्हता, ज्यामुळे ती प्रचंड अशक्त झाली होती.

## सूतगिरणी चौकातील निओ केअर हॉस्पिटलवर २५ हजारांची दंडात्मक कारवाई; महानगरपालिकेच्या घंटागाडीत टाकला होता बायो-मेडिकल कचरा



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नागरिक मित्र पथकाने कचरा वर्गीकरण मोहिमेदरम्यान घंटागाडीत बायो-मेडिकल कचरा टाकणाऱ्या सूतगिरणी चौकातील निओ केअर हॉस्पिटलवर २५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे.

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या देखरेखीखाली शहरात सध्या स्त्रोतावरच १००ऽ कचरा वर्गीकरण करण्याची विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत झोन क्रमांक ७, प्रभाग क्रमांक २१ मधील सूतगिरणी चौक परिसरात पाहणी केली जात असताना संबंधित हॉस्पिटलचा हा बेजबाबदारपणा पथकाच्या निदर्शनास आला आणि त्यांच्यावर तातडीने ही दंडात्मक कारवाई करण्यात आली. बायो-मेडिकल कचरा हा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरतो, त्यामुळे अशा प्रकारच्या कचऱ्याच्या गैरव्यवस्थापनाबाबत महानगरपालिका प्रशासनाने 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारले आहे. नियमांनुसार सर्व संबंधित रुग्णालये आणि आरोग्य संस्थांनी हा वैद्यकीय कचरा सामान्य कचऱ्यात न मिसळता, केवळ त्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी नियुक्त केलेल्या विशेष अधिकृत एजन्सीकडेच सोपवणे बंधनकारक आहे.

ही धडक कारवाई मुख्य स्वच्छता निरीक्षक ओम बडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. या कारवाईदरम्यान प्रभाग प्रमुख सुधाकर खरात, नागरी मित्र पथकाचे संतोष नवगिरे, गौतम वानखेडे, रावसाहेब इधाते आणि सुपरवायझर सतीश खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. शहरात कचऱ्याचे योग्य वर्गीकरण न करणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर यापुढेही अशीच कडक कारवाई केली जाईल, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## महानगरपालिका आणि बीपीसीएलच्या संयुक्त विद्यमाने जाधववाडी बस डेपोत 'स्वच्छता पंधरवडा'




छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जाधववाडी येथील स्मार्ट सिटी बस डेपोमध्ये 'स्वच्छता पंधरवडा' अंतर्गत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय स्वच्छता मोहिमेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेले बस चालक, वाहक (कंडक्टर्स), मेकॅनिक्स आणि इतर प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रसंगी बीपीसीएलने शहर बस सेवा अधिक सुलभ व सक्षम करण्यासाठी बस डेपोमध्ये कन्झ्युमर पंप (ग्राहक इंधन पंप) उपलब्ध करून दिला आहे, ज्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक 'स्वच्छता प्रतिज्ञेने' झाली, ज्यामध्ये उपस्थित सर्वांनी आपल्या वैयक्तिक, व्यावसायिक आणि सार्वजनिक परिसरात स्वच्छता राखण्याची अधिकृत शपथ घेतली. या मोहिमेचा एक भाग म्हणून बस डेपोच्या परिसरामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रमही अत्यंत उत्साहात पार पडला, ज्यामध्ये वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिळून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोपट्यांची लागवड केली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधत दैनंदिन जीवनात आणि कामाच्या ठिकाणी शाश्वत स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान बोलताना महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता तथा सिटी बसचे मुख्य व्यवस्थापक अमोल कुलकर्णी यांनी स्वच्छता ही अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. महानगरपालिका शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत असून, यामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. जर प्रत्येकाने या मोहिमेत मनापासून सहकार्य केले, तरच आपले शहर पूर्णपणे स्वच्छ आणि सुंदर होऊ शकेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये उपव्यवस्थापक प्रेषित वाघमारे, सहाय्यक व्यवस्थापक (प्रशासन) विलास काटकर, डेपो व्यवस्थापक नितेश अडमाने, स्वप्नील पाटील आणि अर्पिता शरद यांचा समावेश होता. तसेच, बीपीसीएल कडून सन्माननीय अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याच्या इंडस्ट्रियल हेड संध्या विद्यासागर, छत्रपती संभाजीनगरचे एरिया मॅनेजर इंडस्ट्रियल अरिहंत गर्ग, टेरिटरी मॅनेजर लुब्रिकंट्स समित राय आणि मार्केटिंग मॅनेजर लुब्रिकंट्स स्वाती अग्रहरी आवर्जून उपस्थित होत्या. हे सर्व बस कर्मचारी दररोज हजारो नागरिकांच्या थेट संपर्कात येतात आणि ते खऱ्या अर्थाने महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करत असतात. याच कारणामुळे त्यांना या स्वच्छता मोहिमेत सामावून घेतल्याने समाजाच्या विविध स्तरांवर याचा बहुआयामी आणि व्यापक प्रभाव पडेल, असे मत या प्रसंगी व्यक्त करण्यात आले.

## शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- शिक्षक संघटना समन्वय समिती, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शिक्षकांवरील अन्याय दूर करण्यासाठी आणि त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या सोडवणुकीसाठी आज जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. गुरुवार, ९ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हे निवेदन देण्यात आले असून, यात शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

यावेळी जिल्हा मुख्य समन्वयक श्रीराम बोचरे, मार्गदर्शक दिलीप ढाकणे, शेख अब्दुल रहीम, बाबूलाल राठोड, महेंद्र बारवाल, नितीन नवले, संजीव देवरे, ज्ञानेश्वर पठाडे, ब्राम्हणद कराड, मनोहर पठे, प्रकाश मुंडे, अयुब पटेल, गणेश सोनवणे आणि इतर प्रमुख पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा सरकारच्या धर्तीवर सन २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांच्या वयाचा आणि मानसिक आरोग्याचा विचार करून टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या नियमांमध्ये शिथिलता देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी पास होण्यासाठी सरसकट ६० गुणांची अट लावण्यात यावी किंवा त्यांच्यासाठी अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र 'टीईटी समकक्ष परीक्षा' घेण्यात यावी, असेही नमूद करण्यात आले आहे.

शिक्षण संचालक, पुणे यांच्या १४ मे २०२६ च्या पत्रान्वये राज्यात सुरू असलेली विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नतीची प्रक्रिया अन्यायकारक असून, ती तातडीने थांबवावी व सदरचे पत्र अधिक्रमित करावे, अशी मागणी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या कालावधीच्या अधीन राहून जे सेवानिष्ठ शिक्षक पदोन्नतीस पात्र आहेत, त्यांना नैसर्गिक न्यायानुसार पदोन्नतीची संधी देण्यात यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

१५ मार्च २०२४ चे संचमान्यता धोरण हे शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींशी विसंगत असल्याचे शिक्षकांनी म्हटले आहे. माध्यमिक शाळांना विषय पदवीधर शिक्षक आणि मुख्याध्यापक पदासाठी शिथिलता दिली जात असताना, प्राथमिक शाळांच्या बाबतीत मात्र दुजाभाव केला जात आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा वाचवण्यासाठी हे जाचक धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या स्पष्ट निर्देशानुसार इतर कर्मचारी उपलब्ध नसतील तरच शिक्षकांना नियुक्त करावे, असे असतानाही स्थानिक पातळीवर प्राथमिक शिक्षकांनाच सतत बीएलओच्या कामाला जुंपले जाते. या अतिरिक्त कामामुळे शिक्षकांचे प्रचंड मानसिक व शारीरिक खच्चीकरण होत असून विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांकडून हे काम तातडीने काढून घेण्यात यावे, अशी मागणीही निवेदनात आहे.

शासनाने या मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय न घेतल्यास संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजाराम राठोड यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर दि.९ (प्रतिनिधी)- वसंतराव नाईक महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजाराम राठोड यांचे निधन झाले. पुरोगामी विचारांचे अभ्यासू शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक भान असलेले नेतृत्व आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीतील सक्रिय शिलेदार म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने शैक्षणिक, सामाजिक आणि पुरोगामी चळवळीतील एक महत्त्वाचा आवाज कायमचा हरपला आहे.

राजाराम राठोड यांनी आयुष्यभर शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाची कास धरली. नामांतर चळवळीच्या काळात वसंतराव नाईक महाविद्यालय हे चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते, याचा अभिमान त्यांनी अनेकदा व्यक्त केला होता. 'वसंतराव नाईक महाविद्यालय शंभर टक्के नामांतरवादी होते आणि ते नामांतर चळवळीचे मुख्य केंद्र बनले होते. याचा मला काल, आज आणि उद्याही अभिमान आहे,' असे ते ठामपणे सांगत असत.

प्राचार्य मतदारसंघातून विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह काऊन्सिलवर निवडून आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा ठराव मांडण्याची ऐतिहासिक संधी त्यांना मिळाली. हा क्षण आपल्या आयुष्यातील सर्वात मोठ्या अभिमानाचा असल्याचे त्यांनी अनेकदा नमूद केले होते.

महाविद्यालयातील प्रा. बापूराव जगताप, प्रा. मोतीराज राठोड, प्रा. सुरेश पुरी, दिवंगत प्रा. जवाहर राठोड यांच्यासह अनेक प्राध्यापकांनी नामांतर चळवळीत सक्रिय नेतृत्व केले. या वैचारिक वातावरणाला दिशा देण्यात राजाराम राठोड यांची महत्त्वाची भूमिका होती. साहित्य, सामाजिक चळवळ आणि शिक्षण यांचा संगम त्यांनी आपल्या कार्यातून घडवून आणला.

(पान १ वरुन)

## मिसिंग लिंक प्रकल्पाची...

ही आमचीच होती. मला हा प्रकल्प करायचा नसता तर मिसिंग लिंकची कल्पनाच का मांडली असती? मिसिंग लिंक प्रकल्प होऊ नये, असे मला वाटत नव्हते. २०१३ च्या डिसेंबर महिन्यात मी या प्रकल्पाला स्थगिती दिली तेव्हा मी सांगितले होते की, या प्रकल्पाचे कॅलक्युलेशन पुन्हा करा, सेफ्टी चेक पुन्हा करा, आणखी अभ्यास करा, विंड टनल स्टडी करा. मिसिंग लिंकला धोका नाही, हे सांगा. तसेच त्यावेळी मला या प्रकल्पाची किंमत योग्य वाटत नव्हती. त्यामुळे मी या प्रकल्पाच्या किंमतीचे मूल्य नव्याने तपासण्यास सांगितले होते. त्यामुळे तेव्हा मिसिंग लिंक प्रकल्पाला माझी नकारघंटा नव्हती. मला हेच करायचं असतं तर या प्रकल्पाची कल्पना पुढे कशी आली असती आणि मी त्याला मंजुरीच का दिली असती, असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी उपस्थित केला.

## मतदार यादी पुनर्रिक्षण कामामुळे...

करताना त्यांच्या नियमित अध्यापनात अडथळा येणार नाही, याची काळजी घ्यावी. हे काम सुट्टीच्या दिवशी किंवा अशैक्षणिक वेळेतच देण्याचे निर्देश आहेत. काही जिल्ह्यांत शिक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यानंतर ते दुरुस्त करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले.

शिक्षक घडवित असलेली भावी पिढी लक्षात घेता हा विषय अत्यंत संवेदनशील असून, शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी मंत्र्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल, असेही डॉ. भोयर यांनी स्पष्ट केले.

## मुख्यमंत्र्यांची विधानसभेत बघून...

यावर लोक बोलले की फडणवीस म्हणतात माझ्यावर टीका करा, पण महाराष्ट्राचा अपमान सहन करणार नाही. वा रे वा! लोकांनी प्रश्न विचारले तर तो महाराष्ट्राचा अपमान कसा? काहीही झाले की देशविरोधी आणि आता महाराष्ट्र विरोधी ठरवायचे? तुम्ही दुसऱ्यांची सरकारे असताना जी आंदोलने केली, ती काय होती?" असा सवाल त्यांनी केला.

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे...

मात्र, ते सोडून जाण्याच्या परिस्थितीत किंवा ते अस्वस्थ आहेत, एवढंच मी म्हणत आहे. आता ते सोडून जातील की नाही? हे देखील मला माहिती नाही. मात्र, ते खासदार अस्वस्थ आहेत एवढं मी ऐकत आहे", असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

## विद्यार्थ्यांची गळती रोखणे आणि...

संजय भेंडे यांनी सहभाग घेतला.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, विद्यार्थ्यांची गळती रोखणे, शिक्षक भरती, आयसीटी व अटल लॅब, रोबोटिक्स शिक्षण, अकरावीचे ऑनलाइन प्रवेश, टप्पा अनुदान, टीईटी, अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे, शाळांच्या भौतिक सुविधा, अनधिकृत शाळांवरील कारवाई, अल्पसंख्याक शाळांतील प्रश्न, कस्तुरबा गांधी विद्यालय, पवित्र पोर्टल आणि शिष्यवृत्ती महापोर्टल अशा विविध विषयांवर गांभीर्याने काम करण्यात येत आहे.

## संतपीठाच्या विकासासाठी तातडीने...

आणि अध्यापकांच्या मानधनासाठी तातडीने निधीची आवश्यकता असल्याने १ कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाईल. उर्वरित बांधकामांच्या गरजांचा आढावा घेऊन आवश्यक निधीही उपलब्ध करून दिला जाईल.

राज्यात अलीकडेच मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली असून त्यालाही अधिक सक्षम करण्यात येत असल्याचे सांगत, दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ तसेच आदिवासींसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत आलेल्या सूचनांचाही शासन स्तरावर एकत्रितपणे विचार सुरू असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.